स्वाद नगरकरांचा..!
बोरुडे मिसळ
। स्पेशल पुरी मिसळ । मिसळ । तर्री वडा । शाबुदाना खिचडी (दही चटणी) । शेंगदाणा लाडू
पार्सल ऑर्डर स्वीकारल्या जातील.
प्रोप्रा. संदीप (बंडू) एकाडे
मो. ९०२८७९३९३९
पटवर्धन चौक, दादा चौधरी शाळेजवळ, अ. नगर

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे  सहसंपादक : तुकाराम कामठे

विजय इलेक्ट्रिकल्स
प्लॉट नं. एम २३, एमआयडीसी, अ. नगर
मो. ७७५७०८७१०० । ७५०७२७४६४८
पाहिजेत क्वालिटी हेड – ०१
पात्रता– बीई मॅकेनिकल ॲण्ड इलेक्ट्रीकल + एक, दोन वर्षाचा अनुभव
क्वालिटी असिस्टंट– डिप्लोमा + बीई फ्रेशर
स्टोअर /परचेस इनचार्ज – डिग्री कोणतीही, अनुभव १,२ वर्षाचा.
इच्छुक उमेदवाराने वरील मो. नं. वर संपर्क साधावा

वर्ष ४ । अंक ७२ । शुक्रवार ६ डिसेंबर २०२४ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## शेवगावमध्ये सुगंधी तंबाखू जप्त

### सहाजणांवर गुन्हा । स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने शेवगाव येथे छापा टाकून एक लाखाची सुगंधी तंबाखू, पानमसाला, गुटखा जप्त केला. या प्रकरणी सहाजणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तिघा आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

एलसीबीच्या पथकाने शेवगाव येथे अवैधरित्या विक्रीसाठी ठेवलेला एक लाख ४ हजार ४२० रुपये किमतीचा विविध कंपन्यांचा सुगंधी पानमसाला, तंबाखू व गुटखा शेवगाव शहरातील खालची वेस येथे पकडला. बुधवारी (दि.६) दुपारी ही कारवाई करण्यात आली.



याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस कॉन्स्टेबल शिवाजी अशोक ढाकणे यांच्या फिर्यादीवरून बिलाल मोहंमद हनिफ तांबोळी (वय ३४), अरबाज मोहंमद रफीक तांबोळी (वय २२), अजीम फारूक तांबोळी (वय ४१), (सर्व रा. खालची वेस, काझी गल्ली, शेवगाव), अख्तर महेबूब आंबेकर (रा. ता. पैठण), दादासाहेब अंकुश जाधव, आदिनाथ अंकुश जाधव (दोघे, रा. ता. गेवराई) या सहा जणांविरोधात अन्न सुरक्षा कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील तीन जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक दिनेश आहेर यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, पोलिस हेड कॉन्स्टेबल संतोष लोंढे, पोलिस कॉन्स्टेबल किशोर शिरसाठ, पोलिस कॉन्स्टेबल आदिनाथ शिरसाठ, तसेच शेवगाव पोलिस ठाण्याच्या

पोलिस कॉन्स्टेबल गीतांजली पाथरकर यांनी शेवगाव शहरातील खालची वेस येथे राहणारे बिलाल, अरबाज व अजीम तांबोळी यांच्या घराची झडती घेतली असता तेथे १ लाख ४ हजार ४२० रुपयांचे विविध कंपन्यांचे ५७६ सुगंधी पानमसाला तंबाखू व गुटखा पुढे आढळून आले. त्यांच्याकडे विचारपूस केली असता सर्व पानमसाला अख्तर आंबेकर, दादासाहेब जाधव, आदिनाथ जाधव यांच्याकडून विक्रीसाठी घेतल्याचे सांगितले. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक धरमसिंग सुंदरडे करीत आहेत.

स्वाभिमानी, शिक्षित आणि सक्षम असा समाजनिर्मिती करण्याचे काम

## डॉ. बाबासाहेब आंबेडकराच्या माध्यमातून झाले – ॲड. आगरकर

### भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर महानगरच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभिवादन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय संविधानाचे जनक महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ज्यांनी भारताला संविधानाच्या माध्यमातून भारतीय लोकशाहीला एक नवीन दिशा दिली. भारत देश हा संविधानावर चालतोय त्यामुळेच आपली लोकशाही ही बळकट आहे. डॉ. बाबासाहेबांची देशावर असलेली अपार श्रद्धा, निष्ठा समाजावर असलेले प्रेमया सामाजिक समरसता प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

दलित, शोषीत, पिडीत, वंचित यांच्यासाठी त्यांनी अहोरात्र असा लढा दिला. अशिक्षितपणा, अंधश्रद्धा, अज्ञान यातून बाहेर काढण्याचे काम त्यांच्या माध्यमातून झाले आहे. त्यांचे विचार आजही समाजाला प्रेरणा देणारे व सुदृढ समाज निर्मितीसाठी उपयुक्त आहेत असे प्रतिपादन शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केले.

भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर महानगरच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर , भाजपा चिटणीस शहर जिला गोपाल वर्मा, सुवेंद्र गांधी, कालींदी केसकर, सुरेखा जंगम, लीलाताई अग्रवाल, निता फाटक, ज्योती दांडगे,मीरा सरोदे, विजय गायकवाड़, विशाल खैरे, सुरेश लालबागे, सचिन पळशीकर, सुनिल सकट, राजेंद्र फुलारे,भारगव फुलारे, ज्ञानेश्वर धिरडे, सुनिल तावरे, प्रकाश जोशी, लक्ष्मीकांत तिवारी, सविता कोटा, राजेंद्र सातपुते,अनिल सबलोक, अनंत देसाई, भानुदास बनकर, गोकुल काळे, प्रीया जानवे, श्वेता पंधाडे, सारीका जंगम, दत्ता गाडलकर, चंद्रकांत पाटोळे, अनिल सबलोक, श्वेता झोंड, सविता कोटा,आदी उपस्थित होते.

## गृहखात्यासाठी शिवसेना आग्रही; भाजपने समोर ठेवले तीन पर्याय

**मुंबई । वृत्तसंस्था–** राज्याच्या मुख्यमंत्री–उपमुख्यमंत्रीपदाचा तिढा सुटल्यानंतर आता गृह खाते शिवसेनेला मिळणार की देवेंद्र फडणवीस हे आपल्याकडेच ठेवणार याची जोरदार चर्चा सुरू आहे. विशेष म्हणजे दोन्ही पक्ष गृह खात्यासाठी आग्रही आहेत. तर, भाजपकडून एकनाथ शिंदेंना गृह खात्याऐवजी ३ खात्यांचा पर्याय देण्यात आल्याची माहिती आहे. गृह खात्याच्या तोडीस तोड असलेल्या खात्याची निवड शिवसेना शिंदे गटाला करायची आहे. त्यामुळे, शिवसेनेपुढे मोठा पेच निर्माण झाल्याचे दिसून येते.

गृहमंत्रालयाच्या बदल्यात एकनाथ शिंदे यांच्यापुढे महसूल, जलसंपदा आणि सार्वजनिक बांधकाम विभाग या तीन खात्यांचा शिवसेनेकडूनही विचार सुरु आहे. शिवसेनेला ३ खात्यांच्या पर्यायांपैकी एक पर्याय निवडावा लागणार आहे. मात्र, गृहखात्याइतकेच महत्वाचे, तोडीस तोड खाते मिळवण्याकरता शिवसेना आग्रही आहे. मात्र, ऊर्जा आणि गृहनिर्माण खाते शिवसेनेला मिळण्याची शक्यता कमी असल्याची सूत्रांची माहिती आहे. त्यामुळे, वरील ३ पर्यायांपैकी एक खाते शिंदे गटाच्या वाट्याला येऊ शकते, त्यामध्ये महसूल हे वजनदार खातं आहे. गत महायुती सरकारमध्ये महसूल खाते भाजपकडे होते, राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे या खात्याची धुरा होती. तर, सार्वजनिक बांधकाम हेही खाते भाजपकडेच होते. मात्र, मुख्यमंत्री पदावरून उपमुख्यमंत्रीपदी विराजमान झाल्याने एकनाथ शिंदे गृहखात्यासाठी आग्रही आहेत. मात्र, भाजप देखील गृह खातं सोडायला तयार नाही.

## सामाजिक समतेचे महानायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर– सचिन जगताप



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सामाजिक समतेसाठी व न्यायासाठी लढणारे व्यक्तिमत्व म्हणजे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय, त्यांचे विचार समाजाला प्रेरणा व ऊर्जा देणारे आहे, सर्व समाजाच्या कल्याणासाठी संविधानाच्या माध्यमातून अधिकार देण्याचे काम केले आहे, आता शहरातील मार्केट यार्ड चौकामध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभा राहत असून शहराच्या वैभवात भर घालेल आजच्या युवा पिढीने त्यांचा आदर्श अंगीकारून आपल्या जीवनामध्ये वाटचाल करावी असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सचिन जगताप यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना जि.प.माजी सदस्य सचिन जगताप यांच्या समवेत ज्येष्ठ नेते अशोक गायकवाड मनपाचे जल अभियंता परिमल निकम अजय साळवे सुरेश बनसोडे जयंत गायकवाड, सुनील शिंदे, सुमित गायकवाड, कौशल गायकवाड आदी उपस्थित होते.

## डॉ. आंबेडकरांनी देशाला राज्य घटनेच्या माध्यमातून एकसंघ ठेवण्याची किमया केली - शेंडगे

### शिवसेना (ठाकरे गट) च्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला जगातील सर्वोत्तम अशी राज्यघटना दिली आहे. या राज्य घटनेच्या माध्यमातूनच आपण प्रजासत्ताक आणि बलशाली राष्ट्र म्हणून वाटचाल करत आहोत. तसेच विविधतेने नटलेल्या आपल्या देशाला राज्य घटनेच्या एका सुत्रात गुंफून एकसंघ ठेवण्याची किमया डॉ.बाबासाहेबांनी केली आहे. राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, अध्यात्मिक, भौगोलिक विविधतेच्या भारत देशाला एकता, समता बंधूतेच्या सूत्रात बांधण्याचे, देशाची सार्वभौमता अखंडित ठेवण्याचे काम बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानामुळे शक्य झाले आहे. असे प्रतिपादन शिवसेना ठाकरे गटाचे माजी गटनेते संजय शेडगे यांनी केले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्केट यार्ड येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना ठाकरे गटाचे माजी गटनेते संजय शेडगे, माजी स्थायी ■ पान ४ वर

## विवाहितेचा विनयभंग करून मारहाण, पतीसह चौघांवर गुन्हा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विवाहितेचा सास–याने विनयभंग केल्यानंतरही पती व सासूने त्याची दखल न घेता उलट तिला मारहाण केली, तसेच याचा जाब विचारण्यास आलेल्या माहेरच्या कडील मंडळीला तुम्ही आमच्या दारात कशाला आलात, असे म्हणून धमकावल्या प्रकरणी पतीसह चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत श्रीगोंदा तालुक्यातील एका चोवीसवर्षीय विवाहितेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, पती, सासू–सासरा व दोन मुलांसह एकत्र कुटुंबात राहते. दि. ५ डिसेंबर रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास सासरी घरी एकटी असताना सासऱ्याने खोलीत बोलावून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. त्यास विरोध केला असता त्याने मला शिवीगाळ करुन जर कोणाला सांगितले तर जीवे मारुन टाकीन अशी धमकी दिली. थोड्याच वेळात पती व सासू घरी आल्यावर त्यांना हा प्रकार सांगितला असता पतीने आबा असे करू शकत नाहीत असे म्हणत तिलाच शिवीगाळ करुन लोखंडी पाईपने मारहाण केली, तर सासूने केस धरुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

त्यानंतर विवाहितेने माहेरी भावास फोन करून हा प्रकार सांगितल्यावर भाऊ दोन–तीन मित्रांना घेऊन आला असता त्यांना पण शिवीगाळ करुन तुम्ही आमच्या दारात् कशाला आले असे म्हणून मारण्याची धमकी दिली. तसेच नणंद ही सुद्धा सारखी घरी येऊन तू माझ्या आई–वडिलांना जीव लावत नाही, त्यांना नीट सांभाळत नाही असे म्हणून घालून पाडून बोलते तसेच भांडणे लावून देते असे फिर्यादीत म्हटले आहे.

याबाबत विवाहितेने भावासह येऊन फिर्याद दाखल केली. त्यावरून पती, सासू–सासरा व नणंद या चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संसदेत काँग्रेस खासदाराच्या सीटखाली आढळले नोटांचे बंडल

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था–** चक्क देशाच्या संसद भवनातील एका खासदार महोदयांच्या सीटखाली नोटांचा बंडल आढळून आल्याने संसदेत चांगलाच गदारोळ माजला आहे. त्यातच, काँग्रेस खासदार आणि ज्येष्ठ विधिज्ञ अभिषेक मनु संघवी यांच्याच सीटखाली हा नोटांचा बंडल सापडल्याने संसदेतील सत्ताधारी पक्षाने जोरदार हल्लाबोल केला आहे.

सध्या संसदेचं हिवाळी अधिवेशन सुरू असून राज्यसभा सभागृहात आज एका खासदार महोदयांच्या जागेवरील सीटखाली नोटांचां बंडल आढळून आल्याने सारेच अवाक् झाले. त्यानंतर, सभागृहात खासदारांचा एकच गोंधळ पाहायला मिळाला. राज्यसभा सभापती जगदीश धनखड यांनी सभागृहाला माहिती दिली. याच मुद्द्यावरुन राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे सभागृहात बोलण्यासाठी उठले असता सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी गोंधळ सुरू केला. त्यामुळे, खर्गे यांनी संताप व्यक्त करत भाजप खासदारांना सुनावलं, असलं चिल्लर काम करुन तुम्ही देशाला बदनाम करत आहात, असे खर्गे यांनी म्हटले.

जगदीश धनखड यांनी सभागृहाला माहिती देताना सांगितले की, मला मिळालेल्या माहितीनुसार एका रुटीन अँटी सेबाटोज तपासादरम्यान काल सभागृहाचं कामकाज संपल्यानंतर सभागृहातूनच नोटांचां बंडल ताब्यात घेण्यात आला आहे. सभागृहातील सीट नंबर २२२ च्या खाली हा नोटांचा बंडल आढळून आल्याची माहितीही त्यांनी दिली. तेलंगणातून राज्यसभा खासदार असलेल्या अभिषेक मनु सिंघवी यांच्यासाठी ते २२२ नंबरचे सीट अलोट केलेले आहे, तिथंच हा नोटांचा बंडल आढळून आल्याचे सभापतींनी सांगितले. या माहितीनंतर खासदार सिंघवी यांनीही आपली प्रतिक्रिया दिली आहे. मी ५०० रुपये घेऊन संसदेत जात असतो, काल दुपारी १२ वाजून ५७ मिनिटांनी मी संसदेत पोहोचलो, तिथून १ वाजता बाहेर पडलो. दुपारी दीड वाजेपर्यंत मी संसदेच्या कँटीनमध्येच होतो, अशी प्रतिक्रिया अभिषेक मनु सिंघवी यांनी दिली.

## आयुष्यात पुढे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यास व क्रीडांगणांची सांगड घालावी – डॉ.मनीषा पुंडे

### दादा चौधरी विद्यालयाच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उत्साहात उद्‌घाटन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** क्रीडांगणांवर खेळल्याने अपोआप सांघिक भावना व खिलाडी वृत्ती निर्माण होत सुदृढता वाढते. मोबाईलवर गेम खेळल्याने शारीरिक व मानसिक आजार निर्माण होतात. त्यामुळे चांगल्या आरोग्यासाठी सर्वांनी क्रीडांगणांशी मैत्री करा. तुमचे आरोग्य जर चांगले असेलतरच लाथ मारेल तेथे पाणी काढण्याची क्षमता तुमच्यात निर्माण होते. विद्यार्थ्यांनी आयुष्यात पुढे जाण्यासाठी अभ्यास व क्रीडांगणांची योग्य सांगड घालावी, असा मौलिक सल्ला शीवछत्रपती पुरस्कात प्राप्त आंतरराष्ट्रीय



खेळाडू डॉ.मनीषा पुंडे यांनी दिला.

दादा चौधरी विद्यालयाच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन डॉ.मनीषा पुंडे यांच्या हस्ते झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी डॉ.पुंडे यांच्याकडे क्रीडाज्योत सुपूर्द करून मानवंदना दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई होते. यावेळी हिंद सेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, मुख्याध्यापक प्रमोद नंदे, क्रीडा शिक्षक प्रसाद सामलेटी आदींसह सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी ■ पान ४ वर

## निवडक

### राजकीय पक्ष आणि नेत्यांच्या विरोधात लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याची तरतूद?

अहिल्यानगर- जुमलेबाजी व अक्कलमारी करुन नागरिकांना भूलथापा देणाऱ्या राजकीय पक्ष आणि नेत्यांच्या विरोधात लोकशाही संरक्षण कायद्यातंर्गत लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याची तरतूद वकील संघटनेने सुचविली आहे. लोकशाही संरक्षण कायदा आणण्यासाठी वकिलांनी सुरू केलेल्या प्रयत्नांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. त्याचा भाग म्हणून या कायद्यात लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याची तरतूद व्हावी आणि अशा याचिका देशातील उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयामध्ये निवाड्यासाठी ठेवण्याची तरतूद या कायद्यात व्हावी, असा पीपल्स हेल्पलाईन व वकील संघटनांचा प्रयत्न आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एका मोठ्या सभेमध्ये जाहीरतीने भाषणात सांगितले होते की, लवकर राष्ट्रवादी पक्षाचे नेते अजित पवार यांनी कोट्यावधीचा सिंचन घोटाळा केला आहे. त्यांना पुढील काही महिन्यात जेलमध्ये जावे लागेल. त्यानंतर महाराष्ट्रात भाजपचे आणि राष्ट्रवादीचे सरकार पहाटे झालेल्या शपथविधी मध्ये सत्तेवर आले. त्यामध्ये अजित पवार यांना उपमुख्यमंत्री करण्यात आले. यातून पंतप्रधान आणि त्यांच्या पक्षाने भारतातील लोकशाहीची केलेली विटंबना जनता विसरणार नाही. यातून भारतातील आम लोकशाहीमध्ये मतदार अक्कलमारी करण्याचा अधिकार राज्यकर्त्यांना असल्याचा भ्रम झाला असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अमेरिकेचे मावळते राष्ट्रपतीनी स्वतःचा मुला विरुद्ध असलेल्या खटल्यामध्ये स्वतःच्या मुलाला सर्वत्र माफी घोषित केली. त्यामुळे जगभरामध्ये लोकशाहीवर विश्वास असलेल्या लोकांमध्ये निराशा निर्माण झाली आहे. सत्तेवर असलेली लोक आपल्या सत्तेचा वापर आपल्या नातेवाईकांसाठी आणि जवळच्या लोकांसाठी कशाप्रकारे सर्रास वापर करतात, या बाबी लोकशाहीला घातक आहेत. यामुळे भारतामध्ये लोकशाही संरक्षण कायदा आणताना लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याचा अधिकार देखील तमाम जनतेला मिळाला पाहिजे, असा वकील संघटनांचा आग्रह आहे. सत्तेवर असणाऱ्या पक्षांनी किंवा मुख्यमंत्री, पंतप्रधान किंवा मंत्रिमंडळातील सदस्यांनीच आपल्या सत्तेचा वापर स्वार्थासाठी किंवा कुटुंबासाठी किंवा जवळच्या व्यक्तीसाठी केला. हे प्रथम दर्शनी लोकांसमोर आले, तर त्यातून लोकशाही अवमान याचिका दाखल करण्याचा अधिकार जनतेला मिळणार आहे. अशा याचिकांच्या निर्णयातून दोषी असलेल्या राजकीय पक्षाची मान्यता निवडणूक आयोगाला काढून घेण्याचा आदेश देखील सर्वोच्च न्यायालयाने किंवा उच्च न्यायालय देऊ शकतील अशी तरतूद या कायद्यामध्ये करण्यासाठी वकील संघटना प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. राजकीय सत्तेच्या दुरुपयोग करणाऱ्या व्यक्तीला सहा वर्षापर्यंत निवडणुकांपासून वंचित ठेवण्याची तरतूद अशा कायद्यात व्हावी. त्याचबरोबर अशा सत्तेवरच्या व्यक्तीला दंड आणि सजादेखील सर्वोच्च न्यायालय किंवा उच्च न्यायालय करू शकेल. भारतात आणि जगभरात आजच्या घडीला कोर्ट अवमान याचिका चालविता येतात, परंतु त्यांना मर्यादा आहे. लोकशाही अवमान याचिकांमधून राजकीय पक्षांवर आणि राजकीय सत्तेवर असणाऱ्या लोकांवर मोठा अंकुश जनतेला ठेवता येणार आहे. राजकीय पुढारी आणि त्यांचे पक्ष जनतेला आकाशातील तारे आणून देण्याचे आश्वासन देतात आणि त्यातून मतदार अक्कलमारी करतात. मागच्या दाराने सत्ता मिळवतात, राजकीय सत्ता मिळण्यासाठी हजारो लबाड्या करणाऱ्यांना यापुढे तुरुंगाची हवा खावी लागणार आहे. अशी तरतुद कायद्यात व्हावी यासाठी वकिलांचा प्रतिसाद व्यापक होत असल्याचे ॲड. कारभारी गवळी यांनी म्हंटले आहे.

## चित्रकूट गुरूकुलच्यावतीने शिक्षकांचा ८ डिसेंबर रोजी 'द फाऊंडेशन बिल्डर अवार्ड'ने सन्मान

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर –** समाजाचा सर्वांगीण विकास साधून राष्ट्र निर्माणात योगदान देणारी पिढी घडविण्याचे काम शिक्षक, शिक्षण संस्थाचालक करत असतात. ज्ञानदानाचे पवित्र कार्य करणाऱ्या अशा शिक्षकांचा चित्रकुट गुरूकुलच्यावतीने द फाऊंडेशन बिल्डर अवार्डने सन्मान करण्यात येणार आहे. दि. ८ डिसेंबर २०२४ रोजी हॉटेल राजयोग येथे हा कार्यक्रम होणार आहे अशी माहिती चित्रकुट गुरुकुलच्या प्राचार्या सारिका आनंद यांनी दिली.

चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलचे संचालक संजय चव्हाण, सीईओ अशोक सचदेव यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम होणार आहे. अहिल्यानगर परिसरातील विविध शाळांचे २०० हून अधिक प्राचार्य, शिक्षक या कार्यक्रमास उपस्थित असणार आहेत. यावेळी शिक्षण, व्यवसाय, तंत्रज्ञान क्षेत्रातील मान्यवर मंडळी सहभागी होऊन भविष्यातील शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, नवनवीन तंत्रज्ञान व शिक्षण पद्धती यावर विचार मांडतील. शिक्षक फक्त पुस्तकी ज्ञान देत नाही तर मुलांमध्ये नीतीमूल्य, संस्कार रूजवून त्यांना भविष्यातील स्पर्धेच्या युगासाठी अधिक सक्षम बनवतात. त्यांच्या कार्याचा गौरव यानिमित्त करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी सन १९४६ पासून सर्वोत्तम व विश्वसनीय सुवर्ण सेवा देणारे सहदेव ज्वेलर्स, सिंपली सायन्स ही नवीन शैक्षणिक धोरणानुसार शाळांमध्ये अत्याधुनिक अध्यापन पद्धतीसाठी पुढाकार घेणारी संस्था, ओमोटेक ही संस्था जी संशोधन आणि नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमात अग्रेसर आहे आणि रेक्स शूज ही भारतातील अग्रगण्य फुट वेअर निर्माता कंपनीचे सहकार्य लाभले आहे

## ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर ट्रेलर,बैलगाडी, ट्रक यांना रिफ्लेक्टिव्ह लावा - महेश भोजने



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**श्रीगोंदा –** सध्या साखर कारखान्यांचे गळीत हंगाम सुरू झाले असून ट्रॅक्टर ट्रेलर बैलगाडी व ट्रक या वाहनातून प्रामुख्याने ऊस वाहतूक होत असते. अशा वाहनांना मागे व पुढे रिफ्लेक्टिव्ह टेप न लावल्यामुळे रात्रीच्या वेळी अपघात होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांना मागे व पुढे रिफ्लेक्टिव्ह टेप लावणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक श्री महेश भोजने यांनी केले.

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर गुरुवारी वाहन चालकांचा मेळावा घेऊन त्यामध्ये ऊस वाहतूक करत असताना घ्यावयाची काळजी याबाबत भोजने यांनी वाहनचालकांना मार्गदर्शन केले. यावेळी भोजने म्हणाले की, रात्रीच्या वेळी प्रवास करताना वाहनाचा अंदाज येत नाही. त्यामुळे ब्रेकिंग डिस्टन्स व स्टॉपिंग डिस्टन्स यांचा मेळ न बसल्यामुळे ट्रेलरला मागून धडक बसून अपघात होण्याचा जास्त संभव असतो.

त्याकरिता सदर वाहनांना मागे व पुढे रिफ्लेक्टर लावणे तसेच वाहनाचा वेग मर्यादित ठेवणे, ऊस वाहतुक करणा-या वाहनांना मोठ्या आवाजाची म्युझिक सिस्टीम न लावणे, चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करणे, वाहने चुकीच्या ठिकाणी रस्त्याच्या कडेला उभे करणे, ऊस ट्रायलीच्या बाहेर भरणे अशा प्रकारच्या गोष्टीमुळे अपघात होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे वाहन चालकांनी योग्य ती काळजी घ्यावी. वाहन वेगावर मर्यादा ठेवावी, वाहन ओव्हरटेक करत असताना काळजी घ्यावी, चुकीच्या ठिकाणी वाहने उभी करू नयेत. अशा प्रकारच्या महत्त्वपूर्ण सूचना भोजने यांनी वाहन चालकांना दिल्या. यावेळी नागवडे कारखान्याचे शेतकी अधिकारी सचिन बागल, बी. जी. काटे, राजेंद्र भुजबळ, वसंतराव गिरमकर, भाऊसाहेब बांदल, राहुल नागवडे उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांचा महापरिनिर्वाण दिन अहमदनगर महाविद्यालयात आयोजित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर –** अहमदनगर महाविद्यालयात डी. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६९ वा महापरिनिर्वाण दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रसंगी बोलतांना, ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा मानत्रतावादी दृष्टीकोन भारतालाच नव्हे तर संपूर्ण जगाला मार्गदर्शक'', असे उदार अहमदनगर महाविद्यालयाचे प्राचार्य डी. आर. जे. बार्नवस यांनी केले. या कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. नोएल पारगे, उपप्राचार्य डॉ. रज्जाक सय्यद, उपप्राचार्य डॉ. दिलीपकुमार भालसिंग, उपप्राचार्य डॉ. प्रीतम बेदरकर यांच्या सह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी अद्वोता सुद्रिक, साक्षी भोसले, श्रेया घोरपडे व रिया तिवारी या विद्यार्थिनींनी आपले मनोगत मांडले. डी. निमिषा बंडेलू यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर, डी. सचिन मोरे, डी. पोपट सिनारे, प्रा. लक्ष्मीप्रभा उपाडे व प्रा. आनंद रायकवाड यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष प्रयत्न घेतले.

## विळदघाटात कृषी शिक्षण दिन मोठ्या उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर –** ०३ डिसेंबर हा दिवस भारताचे पहिले राष्ट्रपती व कृषी मंत्री डॉ. राजेद्र प्रसाद यांचा जन्मदिन राष्ट्रीय कृषी दिन म्हणून संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. यानिमित्त लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालय, विळदघाट येथील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची कॉलेजच्या परिसरात कृषी शिक्षणाच्या अनुषंगाने विविध विषयावर शिवार फेरी आयोजित करण्यात आली. त्याच प्रमाणे या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आले. या दरम्यान भारतीय कृषी संशोधन परिषदेचे (शिक्षण) उपसंचालक डॉ. आर .सी. अग्रवाल यांनी कृषी शिक्षणाबाबत सविस्तर प्रबोधन केले. सद्यस्थितीतील शिक्षणाचे महत्व, सद्यस्थिती, भविष्यातील संधी आणि गरज तसेच राष्ट्रीय स्तरावर उपयुक्त आणि त्यावरील गरजेनुरुप उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन त्यांनी केले. तसेच चालू वर्षापासून कृषी शिक्षणात नवीन राष्ट्रीय शिक्षण प्रणाली - २०२० नुसार बदल सुचविण्यात आलेला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. एम. बी. राऊत, सहयोगी प्राध्यापक डॉ. एच. एल. शिरसाठ, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. किरण दांगडे, डॉ. व्ही. एस. निकम, प्रा. किशोर मोरे यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे यांनी विद्यार्थ्यांनी कृषी क्षेत्रातील पूर्वस्थितीतील कृषी व्यवसाय परिस्थिती आणि सद्यपरिस्थितीत सुधारित शेती व्यवसाय उदा. उच्च तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, अन्नद्रव्य व्यवस्थापन, सिंचन पद्धती, पशुसंवर्धन तंत्रज्ञान, फळबाग तंत्रज्ञान, एकात्मिक शेती पद्धती इत्यादी बाबत झालेला बदल कृषी शिक्षणाद्वारे झालेला असून पुढील काळात देखील अजून अद्ययावत असा बदल दिसून येईल. तसेच नवीन पिढीने कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान नाविण्यपूर्ण संशोधन या क्षेत्रात स्वतःची आवड निर्माण करावी या अनुषंगाने मार्गदर्शन केले. तसेच सहयोगी प्राध्यापक डॉ. एच. एल. शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाचे महत्व व उपप्राचार्य डॉ. एम. बी. राऊत यांनी कृषी क्षेत्रामधील संधी याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एम. एस. अनारसे यांनी केले.

## सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये 'फूड आणि ट्रेड फेअर' उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर –** तारकपूर येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांनी फूड आणि ट्रेड फेअर आयोजित करून प्रत्यक्षात खरेदी विक्री व्यवसायाचा अनुभव मिळवला. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनी गणित विषया अंतर्गत वर्ग शिक्षिका इशरत शेख आणि तसनीम हकीमजीवाला यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात हा उपक्रम राबविला. मुलांना मार्केटिंग, खरेदी-विक्री, भांडवल, नफा तोटा या गोष्टींना जीवनात किती महत्त्व आहे याचे व्यावहारिक ज्ञान या उपक्रमामुळे मिळाले.

फूड आणि ट्रेड फेअर मध्ये विविध खाद्यपदार्थ पाणीपुरी, भेळ, चीज् सँडविच, क्लब सँडविच, नूडल्स, मॅगी, केक्स , पेस्ट्रीज, गेम्स, रगडा, चाट, इडली, दोसा, पॉपकॉर्न, आवळा कॅन्डी, पर्सेस, पाऊचेस, हेअर क्लिप्स, हेअर ॲक्सेसरीज, डस्टर अशा अनेक प्रकारचे वस्तू विक्रीस ठेवण्यात आल्या होत्या. २८ गटांमध्ये असे विविध प्रकारचे खाद्यपदार्थ आणि वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. बऱ्याच मुलांना दुपटीने फायदा झाला, बऱ्याच मुलांना थोडा कमी फायदा झाला आणि काही मुलांना नुकसानही सहन लागले. परंतु हे सगळे त्यांच्या अभ्यासक्रमात असून त्यांना या सगळ्या गोष्टी प्रात्यक्षिकासह शिकायला मिळाल्या.

संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, विश्वस्त सुरेश हिरानंदानी आणि महेश मध्यान यांनी या वेळी आवर्जून उपस्थित राहत विद्यार्थ्यांचे कौतुक केले. त्यांनीही विविध प्रकारच्या वस्तू खरेदी करत मुलांना प्रोत्साहन दिले. प्राचार्य गीता तांबे, उपप्राचार्य कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली फूड आणि ट्रेड फेअर घेण्यात आला आणि मुलांना विविध प्रकारे मार्गदर्शन करण्यात आले. संस्थेचे उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, खजिनदार दामोदर माखीजा, विश्वस्त राजकुमार गुरुनानी, हरेश मध्यान मुख्याध्यापिका गोदावरी किरतानी यांनी सर्व प्रोग्राम कमिटीचे खूप खूप अभिनंदन केले.

## केडगाव औदयोगीक वसाहतीमध्ये कामगारना स्वच्छता गृहाची दुरावस्था

### महापालिकेचा स्वच्छता विभागचे दुर्लक्ष

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** केडगाव येथे स्वच्छता अभियानाचा बोजवारा केडगाव -शासन सर्वत्र स्वच्छता अभियान राबवत असताना केडगाव येथील औद्योगीक वसाहत मधील कारखानदारानी स्वच्छता अभियानाला हरताळ फासला. येथील सिंमेट गोडाऊन मध्ये काम करणाऱ्या कामगाराना शौचालयाची व्यवस्था नसल्यामुळे उघडयावर शौचालयास जाण्याची वेळ आली आहे. याचा त्रास स्थानिकांना होत आहे महापालिकेचा स्वच्छता विभाग या कडे दुर्लक्ष करत आहे. केडगाव येथील औदयोगीक वसाहत आहे. जवळपास शंभर कारखाने आहे. सिमेर गोडाऊनची संख्या मोठया प्रमाणात आहे. या सिमेंट गोडाऊन मध्ये जवळपास दोनशे ते तिनशे कामगार आहे. या गोडाऊन मध्ये काम करतात तेथे स्वच्छता गृहाची व्यवस्था नाही, पर्यायी कामगारा ना उघड्यावर शौचालयास जाण्याची वेळ आली आहे. शासन स्वच्छ भारत मिशन संकल्पना राबवत आहे स्वच्छते विषयी बक्षिसे मिळाले असताना मात्र केडगाव येथे कामगारांना स्वच्छता ग्रहाची व्यवस्थाच नाही. हे कामगार येथे असणाऱ्या रो- हौसीग मधून ये जा करतात याचा त्रास स्थानिकांना होत आहे.

## नेप्तीत अखंड हरिनाम सप्ताह

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती येथील चौरे मळ्यातील दत्त मंदिर येथे दत्त जयंती निमित्त गुरुवर्य प.पू.वै. धुंडा महाराज यांच्या आशीर्वादाने चौरे परिवार , दत्त सेवा मंडळ व ग्रामस्थ यांच्यावतीने सालाबादप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताहाचे दि. ८ डिसेंबर ते दि. १५ डिसेंबर दरम्यान आयोजन केले असल्याची माहिती रामदास फुले यांनी दिली .

ह.भ.प. देवराम महाराज फुले यांच्या हस्ते दि.८ डिसेंबरला सकाळी ९ वा. कलश स्थापना होऊन सप्ताहाची सुरुवात होणार आहे.तसेच या सप्ताहात रोज ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सकाळी ८ ते ११ व दुपारी २ ते ४या वेळात ह. भ .प .शंकर महाराज कदम व त्यांचे सहकारी करणार आहेत. हे सप्ताहाचे ४१ वे वर्ष असून या सप्ताहात पहाटे ४ वा. काकडा भजन, सकाळी ८वा. विष्णूसहस्रनाम ,सकाळी १० वा. गाथा भजन, रात्री ९ते ११ या वेळात महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार या सप्ताहात आपली सेवा देणार आहेत. रविवार दि. ८ डिसेंबरला रात्री ९ ते ११ या वेळात ह .भ.प .देविदास महाराज अडभाई चांदा ता. नेवासा यांचे कीर्तन होईल, दि. ९ रोजी ह. भ .प .सचिन महाराज पुंड शिंगवे तुकाई ,दि. १० रोजी ह. भ .प .गणेश महाराज कुदळे चिचोंडी शिराळ, दि.११ रोजी ह. भ. प. प्रेमानंद महाराज शास्त्री वडगावकर, दि. १२ रोजी ह. भ. प. राऊत दादा महाराज पिंपळा ता. आष्टी, दि.१३ रोजी हरिभाऊ महाराज भोंदे पिंपळगाव माळवी ता.अहिल्यानगर, शनिवार दि.१४ रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळात ह .भ .प.मुकुंदकाका महाराज जाटदेवळे यांचे दत्त जन्माचे कीर्तन होईल .तसेच ६ ते ८ या वेळेत पालखी सोहळ्याचा कार्यक्रम होईल .रात्री ९ ते११ या वेळेत ह .भ.प.दिनकर महाराज आचवले यांचे किर्तन होईल. रविवार दि. १५डिसेंबरला ह. भ .प.बाळकृष्ण महाराज कांबळे ताराबाद ता. राहुरी यांचे काल्याचे किर्तन सकाळी १० ते १२ या वेळेत होईल.

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील विद्यालयात संविधान दिन साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, कृषी महाविद्यालय, विळदघाट, अहिल्यानगर येथे संविधान दिन साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. बी. धोंडे यांच्या अध्यक्षतेखाली संविधान प्रास्ताविकेच्या वाचनाने संपन्न झाला. याप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे यांनी अध्यक्षीय मनोगतात भारतीय संविधानाची वैशिष्ट्ये, महत्त्व व इतिहास, भारतीय लोकशाही करता भारतीय संविधानाची आवश्यकता याबाबतचे मार्गदर्शन उपस्थितांना केले. तसेच यावेळी मुंबई येथे झालेल्या २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यातील शहीद जवानांना अभिवादन देखील करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. किरण दांगडे यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. एस. बी. राऊत, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. डी. एम. नलावडे, सहयोगी प्रा. डॉ. एच. एल. शिरसाठ तसेच महाविद्यालयीन प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. एस. बी. राऊत यांनी केले.


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, सहसंपादक– तुकाराम कामठे, कार्यकारी संपादक – जयश्री विजय सांगळे मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Co-editor- Tukaram Kamate, Executive Editor- Jayshri Vijay Sangale Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## निवडक

### शासकीय व निम शासकीय कार्यालयात राष्ट्रसंत श्री जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करावी- डोळसे

अहिल्यानगर -महाराष्ट्र शासनाने राष्ट्रसंत



श्री संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करण्याचे आदेश महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.ज.पु.ति.२२१८/ प्र.क्र.१९५/२९ दि.२६/१२/२०१८ रोजी पारित केलेले आहे. तरी सर्व अहिल्यानगर जिल्ह्यातील सरकारी कार्यालय,पोस्ट ऑफिस,पोलीस स्टेशन,कलेक्टर कचेरी,तहसीलदार कचेरी,जिल्हा परिषद, ग्रामपंचायत पोस्ट ऑफिस,महानगरपालिका, शाळा,महाविद्यालय तसेच शासकीय, निमशासकीय कार्यालयात दि.०८/१२/२०२४ रोजी वार रविवारी सरकारी कार्यालयांना सुट्टी आहे.तरी आपणास विनंती आहे की,राष्ट्रसंत श्री संताजी जगनाडे महाराज यांची जयंती साजरी करावी.जयंती साजरी करण्यासाठी कोणाला फोटो हवे असल्यास हरिभाऊ बाबुराव डोळसे, पत्ता-घर नंबर ५२३६, जुना बाजार,अहिल्यानगर.अधिक माहिती साठी मोबाईल नंबर-९८२२२७१८०७ यांच्याशी संपर्क साधावा.असे आवाहन महाराष्ट्र प्रांतिक तैलीक महासभेचे नाशिक विभागीय कार्याधक्ष हरिभाऊ डोळसे यांनी केले आहे.

### मतदार अक्कलमारी शून्यावर आणण्यासाठी रविवारी नागरिकांचा होणार शपथविधी

अहिल्यानगर- शहरातील सावेडी बस स्थानकाच्या जागेतून मतदार अक्कलमारी शून्यावर आणण्यासाठी रविवारी (दि.१० नोव्हेंबर) सकाळी ११ वाजता नागरिकांचा जाहीर शपथविधी होणार आहे. गेली ५० वर्षे देशात मतदार अक्कलमारीतून सत्तापेंढारी आणि गुन्हेगारांच्या मागच्या दाराने सत्ता मिळवण्याच्या तंत्राला सुरुंग लावण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेची चळवळ असल्याची माहिती अ‍ॅड. कारभारी गवळी यांनी दिली. सध्याच्या महाराष्ट्रातील सार्वजनिक विधानसभा निवडणुकीमध्ये तमाम मतदारांनी ऑपरेशन डिच्चू कावा व डिच्चू फत्तेची अंमलबजावणी करण्यासाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद प्रयत्नशील आहे. देशाला स्वातंत्र्य दीडशे वर्षांच्या लढ्यानंतर मिळाले, परंतु त्यासाठी लाखो लोकांना हुतात्मे व्हावे लागले, स्वतंत्र्योत्तर भारतात लोकशाही तत्वप्रणाली आणि सन १९५२ पासून निवडणुका सुरू झाल्या, परंतु गेल्या ५० वर्षात देशभरात सत्तामारी, टक्केवारी व फ्लेक्स दारोदारी यातून मिळवलेल्या काळ्या पैशाचा वापर मतदार अक्कलमारी करण्यासाठी सर्रास सुरू आहे. अण्णा हजारे यांनी वीस वर्षांपूर्वी जाहीर रीतीने स्पष्ट केले होते, की निवडणुकीमध्ये मी फॉर्म भरला तर डिपॉझिट देखील जप्त होईल, मतदार हे पाचशे रुपये देणाऱ्यांच्या मागे जातात यातून भारतातील लोकशाहीला झालेला कॅन्सर सर्वांनी मान्य केला असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी डिच्चू कावा आणि डिच्चू फत्ते तंत्राचा वापर स्वराज्य उभे करण्यासाठी केला. महात्मा गांधीजींनी इंग्रजांच्या विरुद्ध सन १९४२ मध्ये आझाद मैदानावरून चले जाव! ची घोषणा दिली होती. त्यातून क्रांती झाली. आज नगरसह सर्वच शहरांमध्ये रस्त्यांना खड्डेच खड्डे आहेत, दारिद्र्य वाढत आहे, झोपडपट्ट्या वाढत आहेत आणि आया-बहिणींना अशा झोपडपट्ट्यांमधून नालीच्या कडेला उघड्यावर आंघोळ करावी लागते. देशात गुन्हेगारी वाढली आहे. भ्रष्टाचार आणि सार्वजनिक जीवन संपुष्टात येत आहे. या सर्व गोष्टींच्या मागे फक्त एकच बाब आहे, ती म्हणजे मतदार अक्कलमारी. मतदार स्वार्थासाठी मतकोंबाड होतात, जाती धर्मांच्या नावावर मतदान करतात. परंतु सत्तापेंढारी वेगवेगळ्या तंत्राचा वापर करून मतदार अक्कलमारी यशस्वी करतात. स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर तरी मतदारांनी आणि नागरिकांनी स्वतःच्या स्वार्थासाठी संपूर्ण देशाला बळी देत आहेत, आर्थिक स्वातंत्र्यापासून तमाम जनतेला वंचित करत आहोत, या बाबी लक्षात घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे मतदार अक्कलमारी विरुद्ध लोकब्रह्मास्त्र संघटनेने ऑपरेशन डिच्चू कावा आणि डिच्चू फत्ते या स्वरुपात मतदारांच्या हाती दिले असल्याचे म्हंटले आहे.

# हिंदी-मराठी गाण्यांनी सजलेल्या स्वरांच्या संगीत सोहळ्यात श्रोते मंत्रमुग्ध

## अनामप्रेम मधील दृष्टीहीन गायकांसह आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गायकांचा शहरात रंगला 'दिल से सारेगामापा'

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** धनश्री म्युझिक अ‍ॅण्ड इव्हेंट मॅनेजमेंटच्या वतीने आयोजित स्नेहालय संचलित अनामप्रेम मधील दृष्टीहीन गायकांसह आंतरराष्ट्रीय दर्जाच्या गायकांचा दिल से सारेगामापाची संगीत मैफल शहरात रंगली होती. दृष्टीहीन गायकांना मंच उपलब्ध करुन त्यांना प्रोत्साहन व आर्थिक पाठबळ देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भक्तीगीत, प्रेमगीत आणि देशभक्तीच्या हिंदी-मराठी गाण्यांनी सजलेल्या स्वरांच्या संगीत सोहळ्यात श्रोते मंत्रमुग्ध झाले.

इंडियन आयडॉल फेम गायक हेमंत कुमार राठोर यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमासाठी आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गायक साईराम अय्यर यांची विशेष उपस्थिती होती. टिळक रोडवरील नंदनवन लॉन येथे झालेल्या दिल से सारेगामापाचे उद्घाटन सेवानिवृत्त मेजर अशोक कुमार सिसोदिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. याप्रसंगी अनाम प्रेमचे अध्यक्ष अजीत माने, पत्रकारांच्या अधिस्विकृती समितीचे नाशिक विभागीय अध्यक्ष सुधीर लंके, हेमंत कुमार राठोर, डॉ. दमन काशीद, युवा गायिका अंजली गायकवाड, वसंत बोरा, अंगद गायकवाड, सुप्रसिद्ध अभिनेत्री व निर्माती सारा दुर्गा, मॉडेल प्रसाद बोगावत यांच्यासह अनाम प्रेम मधील दृष्टीहीन गायक-गायिका व कलाकार उपस्थित होते.



देवा हो देवा... गणपती देवा... या गीताचे सादरीकरण करुन अनामप्रेमच्या कलाकारांनी दिल से सारेगामापा कार्यक्रमाची सुरुवात केली. गौरी या गायीकीने गायलेल्या कर्मा चित्रपटातील दिल दिया है जान भी देंगे, ए वतन तेरे लिए!.... या गीताने वातावरण देशभक्तीमय केले. तर सत्यम शिवम सुंदरम.... गीत सादर करताच उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाट अनाप्रेमच्या कलाकारांना दाद दिली.

नंदनवनच्या हिरवळीवर संगीतची रम्य संध्याकाळ बहरली होती. राहुल पेटारिया या अनामप्रेमच्या विद्यार्थ्याने एका हाताने टाळी वाजवून, हाताने तबल्याचे बोल वाजून कव्वाली व भजन सादर करुन उपस्थितांनी अवाक केले. प्रशांत त्रिभुवन यांनी माऊथ ऑर्गनचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

इंडियन आयडॉल फेम गायक हेमंत कुमार राठोर यांनी लगी तुमसे मन की लगन.... या गीताने वातावरण प्रफुल्लित केले. तर हिरे मोती मैना चाहू, मै तो चाहू संगम तेरा! हे आपल्या पहाडी आवाजाच्या शैलीत सादर करुन उपस्थितांची वाहवाह मिळवली. सुदर्शन राव यांनी सेक्सोफोनच्या वाद्याने पहिली नजर में पहला प्यार हो गया... चे संगीत वाजवले.

अंजली गायकवाड हिने भोर भरे पनघट पे!.... गीत सादर केले, तर ए वतन वतन आबाद रहे तू!... या देशभक्ती गीताने अंगावर शहारे आणले. तसेच अंजली हिने अधीर मन झाले!... या मराठी गीताने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाचे खास आकर्षण असलेले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे गायक साईराम अय्यर यांनी आशा भोसले यांच्यासह इतर महिला गायिकांच्या हुबेहुब आवाजात गीत सादर करुन प्रेक्षकांची मने जिंकली. तर अय्यर यांनी तू मिले दिल खिले!...., पहिला नशा पहिला खुमार!... या गीतांनी संगीत मैफलीत रंग भरला.

हेमंत कुमार राठोर यांनी नुसरत फतेह अली खान यांची तेरे बिन जिया जाये ना...., अब तो आदत सी है मुझको, ऐसे जीने की!... हे हिंदी चित्रपटातील गाणे सादर केले. सुनील देठे या कलाकाराने या अली रहम अली... हे गीतचे सादरीकरण केले. उत्कृष्ट वाद्यांचे सादरीकरण व गायकांचे मनाला भिडणाऱ्या स्वरांनी संध्याकाळ रंगली होती.

विविध वाद्य कलाकारांनी गायकांना उत्कृष्ट साथ दिली. यामध्ये गिटार वादनसाठी अजित अमर डमीन, संजय आठवले, संकेत देहाडे, ड्रमसेटवर प्रशांत त्रिभुवन, चाणक्य देवचक्के, कॉंगोवर सोनू साळवे, कच्छी ढोलवर कुमार साळवे, रिदम मशीन व ऑक्टो पॅडसाठी बंटी ओहोळ, ढोलक व तबल्यासाठी जॉय जाधव यांनी साथ दिली. कवियत्री व सामाजिक कार्यकर्त्या सरोज आल्हाट यांचे कार्यक्रमास विशेष सहकार्य लाभले. आर.जे. प्रसन्ना यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. काशीद हॉस्पिटल व वसंत पेंट्स या कार्यक्रमाचे सहप्रायोजक होते.

## अहिल्यानगरच्या खेळाडूंची राष्टीय कुराश स्पर्धासाठी निवड

### । श्री स्वामी समर्थ प्रतिष्ठानच्या वतीने सर्व खेळाडूंचा सत्कार
### । खेळाडूंनी मिळविले यश कतुकास्पद - संदीप दातरंगे



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** आज प्रत्येक व्यक्तीमध्ये प्रतिकार शक्ती वाढविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, त्यासाठी नियमित व्यायाम व मैदानी खेळ खेळले पाहिजे. सध्या मुलांचे मैदानी खेळाकडे दुर्लक्ष होतांना दिसत आहे. त्यामुळे आजारी पडण्याचे प्रमाणही वाढत आहे. त्यामुळे मुलांनी अभ्यासबरोबर जास्तीत जास्त वेळ मैदानी खेळ खेळले पाहिजे. शरीर स्वास्थ्य व एकाग्रतेसाठी मैदानी खेळ उत्तम पर्याय आहे. विद्यार्थीही खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करता जिल्हा व विभागीय, राज्य,राष्टीय पातळीवर यशस्वी होत आहे अहिल्यानगरच्या खेळाडूंनी कुराश स्पर्धेत मिळविलेले यश कतुकास्पद असल्याचे प्रतिपादन श्री स्वामी समर्थ प्रतिष्टान चे अध्यक्ष संदीप दातरंगे यांनी केले आहे.

श्री स्वामी समर्थ प्रतिष्टान च्या वतीने अहिल्यानगरच्या खेळाडूंची राष्टीय कुराश स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी खेळाडू विद्यार्थी कु सिद्धी दातरंगे ,कु ऋचा बोगा ,आर्यन आगरकर ,यश शिंगारे ,पियुष शिंगारे आदींसह पे गोरख खंडागळे ,पे जयंत शिंदे (वस्ताद),पे शुमभ दातरंगे ,सनी आगरकर ,गणेश दातरंगे ,राकेश बोगा ,ओम दातरंगे ,ओंकार वाघमारे ,गणेश राणे ,आकाश कदम ,रोहित भोसले ,अभय बेरड ,आशिष बंदरकर आदी प्रतिष्टान चे सदस्य उपस्थित होते .

वरील सर्व खेळाडूंना प्रा संजय धोपावकर व आदित्य धोपावकर यांचे मार्गदर्शन मिळाले. म्हणाले की विदयार्थ्यांनी फक्त स्पर्धेपुरते मैदानावर न राहता कायम स्वरूपी मैदानी खेळ खेळले पाहिजे त्यामुळे विद्यार्थी हा चांगला खेळाडूं तयार होऊ शकतो.

## लांडगे यांना मिलेनियर फार्मर ऑफ इंडिया पुरस्काराने सन्मानित

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** नगर तालुक्यातील पिंपळगाव लांडगा येथील प्रगतशील शेतकरी गोरक्षनाथ लांडगे यांना भारतीय कृषी संशोधन परिषद नवी दिल्ली यांच्यावतीने शेतीतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रीय स्तरावरील मिलेनियर फार्मर ऑफ इंडिया हा सर्वोच्च पुरस्कार देण्यात आला कृषी जागरण आणि कृषी संशोधन परिषद व महेंद्रा ट्रॅक्टर यांच्या संयुक्त पणे आयोजित दिल्ली येथील पुसा कॅम्पस मध्ये केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी व केंद्रीय कृषी राज्यमंत्री कैलास चौधरी यांच्या उपस्थित मध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

लांडगे हे मागील काही वर्षापासून प्रयोगशील शेती करत आहेत आज देशांमध्ये जे काही अन्न धान्य फळे व भाजीपाला यांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जात आहे त्यावर मोठ्या प्रमाणात रासायनिक कीटकनाशके व रासायनिक बुरशीनाशके यांचा रोग व किड नियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणात वापर होत आहे त्यामुळे अन्न धान्य फळे भाजीपाला यामध्ये मोठ्या प्रमाणात केमिकल अंश येत आहेत त्याचा मानवी शरीरावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहेत आज भारतीय तसेच जागतिक बाजारपेठेमध्ये केमिकल अंश विरहित अन्नधान्य फळे व भाजीपाला मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध आहे परंतु त्या प्रमाणात फळे व अन्नधान्य मिळत नाही.

या सर्व गोष्टीचा विचार करून लांडगे यांनी कांदा या पिकामध्ये एकात्मिक पद्धतीने सेंद्रिय खते जिवाणू खते रासायनिक खते यांचा योग्य वापर करून मातीचे आरोग्य जपले त्याचबरोबर पिकावरील कीड नियंत्रणासाठी जैविक कीडनाशके व रोग नियंत्रणासाठी जैविक बुरशीनाशके



यांचा वापर करून केमिकल अंश विरहित तसेच युरोपियन स्टँडर्ड नुसार मोठ्या प्रमाणात निर्यात योग्य असे कांदा उत्पादन घेतले या सर्व गोष्टीचा विचार करून भारतीय कृषी संशोधन परिषद ने पुरस्कारासाठी गोरक्षनाथ लांडगे यांची निवड करण्यात आली जैविक शेती करण्यासाठी ज्यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले असे बायोमिचे सीईओ जैव रसायन शास्त्रज्ञ डॉक्टर प्रफुल्ल गाडगे सर भारत विघ्ने सर उमेश सर यांच्या प्रयत्नामुळे केमिकल अंश विरहित कांदे उत्पादन घेता आले पुरस्कार मिळाल्याबद्दल पिंपळगाव लांडगा ग्रामस्थांच्या वतीने वाघेश्वरी ॲग्रो मिल्क प्रा लि चे चेअरमन दीपक लांडगे संजीवनी पतसंस्थेचे चेअरमन गुलाबराव लांडगे दैनिक लोक आवाजचे संपादक विठ्ठल लांडगे भैरवनाथ फार्मर्स कंपनीचे राजेंद्र लांडगे व दत्तात्रय कुमटकर ऑडिटर पांडुरंग लांडगे जी स पी क्राप सायन्स कंपनीचे व्हाईस प्रेसिडेंट राजेंद्र लांडगे वि का चे चेअरमन साहेबराव किसान मोर्चा चे तालुका अध्यक्ष महेश लांडगे मोहम्मद शेख दिनकर लांडगे पारगाव चे माजी सरपंच शिवाजी शिंदे शरद बडे पिंपळगाव लांडगा कृषी सहाय्यक सौ नांगरे मॅडम या सर्वांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल अभिनंदन केले.



महायुतीच्या शपथ ग्रहण सभारंभ संपन्न झाल्यावर भिंगार मध्ये पेढे वाटून आनंद व्यक्त करण्यात आला,यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस चे भिंगार अध्यक्ष संजय सपकाळ, भाजपाचे नेते वसंत राठोड किशोर कटोरे,विशाल अण्णा बेलपवार,विठ्ठलराव लोखंडे,मिराबाई आल्हाट,राजेश काळे आदींसह भिंगारवासीय उपस्थित होते.

## देवा भाऊच्या शपथविधी प्रसंगी भिंगारला मुख्यमंत्री आपला दवाखान्याचा शुभारंभ

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत अहमदनगर छावणी परिषद क्षेत्रात दोन शहरी आरोग्य वर्धिनी केंद्र मंजूर झाले असून भिंगार मधील जुनी सरदार वल्लभभाई पटेल शाळा (वाड्याची शाळा) येथे नव्याने तयार केलेल्या शहरी आरोग्यवर्धिनी केंद्राचे मुख्यमंत्री आपला दवाखाना उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार या महायुतीच्या शपथ ग्रहण प्रसंगी करण्यात आले अशी माहिती छावणी परिषदेचे उपाध्यक्ष वसंत राठोड यांनी दिली

५ डिसेंबर रोजी दुपारी ५ वाजता छावणी परिषदेचे अध्यक्ष ब्रिग. रसेल डिसोझा यांच्या हस्ते



मुख्यमंत्री आपला दवाखाना चा शुभारंभ करण्यात आला यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विक्रांत मोरे ,उपाध्यक्ष वसंत राठोड ,मॉर्निंग ग्रुपचे

संजय सपकाळ,किशोर कटोरे,विशाल अण्णा बेलपवार, डॉक्टर धनंजय कर्डिले, डॉक्टर अभिजीत आल्हाट, जेष्ठ नागरिक विठ्ठलराव लोखंडे,मिराबाई आल्हाट,आर एम ओ डॉ गीतांजली पवार, अधीक्षक नेहा पारनाईक,राजेश काळे आदींसह भिंगार वासीय उपस्थित होते. या शहरी आरोग्य वर्धिनी केंद्राच्या माध्यमातून नागरिकांना मोफत उपचार मिळणार असून त्यांना राहत्या घरापासून जवळ आरोग्य सुविधा उपलब्ध झाली आहे.

## विविध उपक्रमांमध्ये सहभाग यशाचा मंत्र - सागर कोरडे

### जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे उद्घाटन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** सध्या सर्धेचे युग असून, पुस्तकी ज्ञानाबरोबर इतर उपक्रमांमध्ये सहभाग युवकांना यशाचा मंत्र बनला आहे. सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्राबरोबर विभिन्न क्षेत्रात करिअरच्या वाटा निर्माण झाल्या आहेत. युवकांनी या संधीचे सोने करावे, असे प्रतिपादन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सागर कोरडे यांनी व्यक्त केले.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नेहरू युवा केंद्र यांच्यामार्फत सीएसआरडी समाजकार्य महाविद्यालयाच्या सहकार्याने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन केले. या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कोरडे बोलत होते. याप्रसंगी तहसीलदार संजय शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोलनकर, नेहरू युवा केंद्राचे समन्वयक संकल्प शुक्ला, सीएसआरडीचे संचालक डॉ. सुरेश पठारे, सावेडी मसापचे अध्यक्ष जयंत येलूलकर आदी उपस्थित होते.

यंदा जिल्हास्तरीय युवा महोत्सव विज्ञान व तंत्रज्ञानामधील नवसंकल्पना विषयावर आधारित आहे. या युवा महोत्सवात समूह लोकनृत्य, लोकगीत, कथालेखन, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. युवक-युवतींनी दुपारच्या सत्रात समूह लोकनृत्य व लोकगीतांचे उत्कृष्ट सादरीकरण केले.

पुढे कोरडे म्हणाले की, पुस्तकी ज्ञान यश मिळवून देईल ही शाश्वती देता येत नाही, परंतु युवकांनी अभ्यासेत्तर उपक्रमांत सहभागी होऊन प्रयत्न केल्यास यश नक्कीच मिळेल असे त्यांनी सांगितले. तर जिल्ह्यातील युवकांनी राष्ट्रीय युवा महोत्सावात जिल्ह्याचे नाव उंचावण्याचे आवाहन केले.

नेहरू युवा केंद्र समन्वयक संकल्प शुक्ला म्हणाले की, तैयारी ही जित है!.. सामाजिक, सांस्कृतीक व क्रीडा क्षेत्रात युवकांना संधी निर्माण झाली आहे. स्पर्धेचे युग असल्याने युवकांनी सामाजिक, सांस्कृतीक क्षेत्रातून आपल्या कलागुणांना वाव देऊन या क्षेत्राकडेही करिअरची संधी म्हणून पहावे. आपल्यातील क्षमता ओळखण्यासाठी प्रत्येकाने स्पर्धेत उतरण्याची गरज आहे. नेहरू युवा केंद्राकडून युवकांना प्रोत्साहान दिले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जयंत येलूलकर म्हणाले, तरुण सक्षम असेल तर कोणताही देश सक्षम असतो. नेहरू युवा केंद्राच्या माध्यमातून देशातील युवकांसाठी चांगले उपक्रम राबविले आहेत. आजच्या कार्यक्रमाने जिल्ह्यातील युवकांना व्यासपीठ निर्माण करून दिले आहे.

क्रीडा मार्गदर्शक ज्ञानेश्वर खुरांगे यांनी प्रास्ताविकात म्हणाले की, जिल्हा युवा महोत्सवातून प्रथम, द्वितीय येणाऱ्या युवकांची विभागीय महोत्सावासाठी निवड होणार असून, यातील विजेत्यांची राज्यस्तरीय महोत्सवासाठी निवड होईल. यानंतर ११ व १२ जानेवारीला दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रीय युवा महोत्सवासाठी निवड होणार आहे. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील क्रीडा अधिकारी भाऊसाहेब वीर, प्रियंका खिंडरे, क्रीडा मार्गदर्शक विशाल गर्जे, रमेश जगताप, सीएसआरडीचे डॉ. सुरेश मुगुटमल, डॉ. प्रदीप झरे, डॉ. विजय संसारे, डॉ. जेमूल वर्गीस, आलावरी झापके आदी अपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सॅम्युअल वाघमारे यांनी केले.

## श्री गोरक्षनाथजी महाराज यांच्या प्रगटदिन भिंगारमध्ये साजरा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर-** अहिल्यानगरच्या नाथ भक्त परिवाराच्या वतीने गोरक्षनाथजी महाराज यांच्या प्रगटदिनानिमित्त भिंगारच्या ओम शिव चैतन्य गोरक्षनाथ आस्थमाच्या वतीने भव्य पूजा-अर्चा व सर्व भाविकांसाठी नुकतेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते .याचा सुमारे २००० भाविकांनी लाभ घेतला या निमित्त भिगार जवळील मंदिरावर भव्य-दिव्य अशी सजावट व विधुत रोषणाई करण्यात आली होती.

या संपूर्ण सोहळ्याचे आयोजन अनेक वर्षांपासून गुरुवर्य. विजयजी महाराज चव्हाण यांच्या वतीने करण्यात येते.या आनंदमयी सोहळ्यास सामाजिक कार्यकर्ते व.मा.जिल्हा परिषदेचे सदस्य सचिनभाऊ जगताप,दीप चव्हाण ,संभाजी कदम यासह अनेक मान्यवरांनी भेट देऊन दर्शनाचा लाभ घेतला.सचिनभाऊ जगताप यांनी चैतन्य गोरक्षनाथ महाराजांच्या मूर्तीचे दर्शन घेऊन आरती केली.नाथ भक्त परिवाराच्या वतीने दरवर्षी या मंदिर परिसरात अनेक धार्मिक.तसेच सामाजिक उपक्रमाचे सातत्याने आयोजन केले जाते..या उपक्रमासाठी विशाल येंडे,दिनेश सरोदे,आशिष रोहदिया,आदित्य चव्हाण पवन शिंदे,रवी कंडोरे , नरेश कनोजिया , राजेश बहोत यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ‘देवा भाऊ’ची मेहंदी रेखाटून व अनामप्रेम संस्थेत पेढे वाटून साजरा केला शहर भाजपने शपथविधीचा आनंदोत्सव





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गुरवारी सायंकाळी राज्याच्या मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे व अजित पवार यांचा शपथविधी झाल्यावर लगेचच शहर भाजपाच्या वतीने पक्ष कार्यालयात जल्लोषात महायुतीचा शपथविधीचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी फटाक्यांची आतषबाजी करून अनामप्रेम संस्थेमधील विद्यार्थ्यांना पेढे वाटून आनंद साजरा करण्यात आला. तसेच भाजपच्या महिला पदाधिकाऱ्यांनी हातावर मेहंदीने ‘देवा भाऊ’ रेखाटून अनोखा पद्धतीने आनंद व्यक्त केला. यावेळी एकच भाऊ देवा भाऊ, एकच नाथ एकनाथ व एकच वादा अजितदादा अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या.

शहर भाजपचे बहुतांशी पदाधिकारी मुंबई येथे शपथविधी सोहळा प्रत्यक्ष पाहण्यासाठी गेले असल्याने मोजक्या पदाधिकाऱ्यांनी हा आनंदोत्सव उत्साहात साजरा केला. यावेळी सरचिटणीस प्रशांत मुथा व माजी नगरसेवक सुवेंद्र गांधी यांनी फटाक्यांची लहड पेटवून आतषबाजी केली.

यावेळी श्वेता झोंड, नीता फाटक, सुरेखा जंगम, ज्योती दांडगे, रेणुका करंदीकर, गोपाल वर्मा, सुहास पाथरकर, राहुल जामगावकर, अभिजीत ढोणे, प्रशांत बोऱ्हाडे, धीरज पडोळे, दीपक दंडनाईक, पियुष तावरे, प्रा.सुनील पंडित, गणेश गवळी, गणेश कानगावकर, ज्ञानेश्वर धिरडे, दीपक उमाप, सुनील सकट, रोहित पठारे, अशोक भोसले, भानुदास बनकर, विक्रम शिंदे, सचिन पळशीकर, राजेंद्र फुलारे, भार्गव फुलारे आदी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेबांनी दिलेली राज्यघटना केवळ दस्ताऐवज नसून राष्ट्रनिर्मितीचा मूळ मंत्र – विश्वनाथ कोरडे

## पारनेर भाजपाच्या वतीने महामानवाला विनम्र अभिवादन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** बाबासाहेबांनी भारतीय समाजात समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्वाची तत्त्वे प्रस्थापित केली आणि प्रत्येक भारतीयाच्या स्वप्नांना हक्क आणि संधींमध्ये रूपांतरित करण्याचा मार्ग दाखवला. त्यांनी दिलेली राज्यघटना ही आपल्यासाठी केवळ दस्तऐवज नसून राष्ट्रनिर्मितीचा मूळ मंत्र आहे. दैनंदिन जीवन जगत असताना बाबासाहेबांच्या आदर्श आणि तत्त्वांचे पालन करणे हेच खरे अभिवादन असून सर्वांनीच त्या दृष्टीने वाटचाल करणे गरजेचे आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त पारनेर भाजपाच्या वतीने बसस्थानकासमोरील प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांनी घालून दिलेल्या आदर्श व तत्वांना उजाळा देत अभिवादन करताना भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ दादा कोरडे बोलत होते.

यावेळी भाजपाच्या प्रदेश कार्यकारणीचे सदस्य विश्वनाथ दादा कोरडे यांच्या सह भाजपचे तालुकाध्यक्ष राहुल पाटील शिंदे, नगरसेवक पैलवान युवराज पठारे, नगरसेवक अशोक चेडे, आरपीआयच्या आठवले गटाचे पारनेर शहराध्यक्ष प्रदीप नगरे, भाजपचे कोषाध्यक्ष किरण कोकाटे, संतोष शेलार, सतीश म्हस्के, अरुण खामकर, स्वप्निल औटी, वैभव श्रीमंदिलकर, प्रदीप आढाव, शुभम कुलट यांसह इतरही युवक सहकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री कोरडे यांनी सांगितले की, समाजसुधारक, अर्थतज्ज्ञ, विचारवंत, राजकारणी आणि स्वतंत्र भारताचे पहिले कायदा मंत्री भीमराव रामजी आंबेडकर यांनी ६ डिसेंबर १९५६ रोजी अखेरचा श्वास घेतला. त्यानंतर ६ डिसेंबर हा दिवस भारतात महापरिनिर्वाण दिवस म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही महापरिनिर्वाण दिनानिमित्त १ डिसेंबरपासून लाखो अनुयायी मुंबईतील त्यांचे समाधीस्थळ असलेल्या चैत्यभूमी परिसरात दाखल झाले असून आज लाखो अनुयायी हे चैत्यभूमी स्तूपात ठेवलेल्या आंबेडकरांच्या अस्थीकलश व प्रतिमेस अभिवादन करत बाबासाहेबांचे दर्शन घेतील.

# वंचित बहुजन आघाडी अहिल्यानगर दक्षिणच्या वतीने इव्हिएम विरोधात जनआंदोलन स्वाक्षरी मोहीम



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मतदारांनी जनतेला मतदारातून राजा बनविले आहे मतदाराचे इव्हिएमच्या माध्यमातून घोळ घालून एकहाती सत्ता भाजपा सरकारने आणली आहे इव्हिएमच्या विरोधात सहयाची मोहीम राबवत आहे त्याला उस्फूत प्रतिसाद मिळत आहे इव्हिएमच्या विरोधात जो रोष आहे ते दिसून आला आहे असे प्रतिपादन जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी केले.

मार्केटयार्ड चौकात वंचित बहुजन आघाडी अहिल्यानगर दक्षिण व पदाधिकाराच्या सहकार्याने वतीने इव्हिएम विरोधात जनआंदोलन स्वाक्षरी मोहीम घेण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष योगेश साठे, जिल्हा संघटक सुधीर ठोंबरे , विजू भोसले नगर, शहराध्यक्ष हनीफ शेख, महासचिव अमर निरभवणे, जे.डी. शिरसाठ, मनोज कर्डिले, गणेश राऊत, रवींद्र शिरसाठ, अक्षय शिंदे, संजय डहाणे, बबलू भिंगारदिवे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष भगवान गायकवाड, महासचिव राजेंद्र साळवे, शहर अध्यक्ष राम गायकवाड, महिला अध्यक्ष सुनीता गायकवाड, उपाध्यक्ष अर्चना गायकवाड, सिंधुताई साळवे, बाळासाहेब बनकर, बाबासाहेब डोळस,रेखा बनकर, हर्षा पंचमुख, बापू शिंदे, माधवराव चाबुकस्वार, मेहेर भिंगारदिवे, अतुल आखाडे, सचिन साळवे, रवींद्र शिरसाठ, देवराम भिंगारदिवे, हिरामण भिंगारदिवे, अशोक भिंगारदिवे, चंद्रभान भिंगारदिवे, दादू शिरसाठ, दशरथ माळी, शाडू शिरसाठ, पप्पू भिंगारदिवे, रोहन भिंगारदिवे, आदीसह मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.प्रथमत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरीनिर्वाण दिनीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# पुण्यातील आयुर्विमा महामंडळ कार्यालयासमोर पुणे विभागातील विमा प्रतिनिधींचे १७ डिसेंबरला सत्याग्रह आंदोलन- प्रमोदकुमार छाजेड

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय आयुर्विमा महामंडळाने जुन्या सर्व योजना बंद केल्या असून मार्केटमध्ये विक्रीसाठी आणलेल्या नवीन योजनांमध्ये अनेक किचकट तरतुदी, काही संभाव्य तरतुदी, त्रुटींमुळे विमाप्रतिनिधींना अडचणीचे ठरत आहे. नवीन तरतुदींमुळे योजना ग्राहकांना फायदेशीर आहे ही चांगलीच गोष्ट आहे पण विमा प्रतिनिधींना मात्र त्या तरतुदी घातक आहेत याबाबत पुणे येथील भारतीय आयुर्विमा महामंडळाला देखील निवेदन देऊन घातक असलेल्या परिपत्रकाचा विरोध संपूर्ण देशभर विमा प्रतिनिधी करीत आहेत त्या अनुषंगाने मंगळवार दिनांक डिसेंबर रोजी पुणे येथे विभागीय कार्यालया समोर सत्याग्रह आंदोलन पुणे विभागातील विमा प्रतिनिधी करणार आहे.अशी माहिती ऑल इंडिया लाइफ इन्शुरन्स एजंटस् फेडरेशन ऑफ इंडिया पुणे विभागाचे विभागीय संघटक सचिव प्रमोदकुमार छाजेड यांनी दिली.

याबाबत श्री छाजेड यांनी तसे निवेदन नुकतेच पुणे विभागीय कार्यालयाला दिले असून त्यामध्ये त्यांनी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले की विमा प्रतिनिधी यांनी पॉलिसी विक्री केल्यानंतर जर ग्राहकाना काही अडचणीमुळे पुढील वर्षाचे हप्ते न भरल्यास व पॉलिसी सरेंडर केल्यास विमा प्रतिनिधीला दिलेले कमिशन पुन्हा वसुल करण्याची घातक तरतूद करण्याचा छुपा अजेंडा घेवून आयुर्विमा महामंडळ काम करत आहे, अशी आमची भावना झाली असून तसा स्पष्ट उल्लेख या परिपत्रकात जरी नसला तरी पडद्यामागून या हालचाली चालू असल्याच्या दिसून येत आहेत.

आयुर्विमा महामंडळाच्या आजपर्यंत झालेल्या लौकिकामध्ये सर्वात मोठे योगदान माझ्या सारख्या असंख्य विमाप्रतिनिधी बंधु भगिनींनी दिलेले आहे. याचा मला सार्थ अभिमान असून नव्याने चालु असलेल्या हालचाली पाहता आपल्या योजना ग्राहकांसाठी आकर्षक अशा चांगला बोनस देणा–या आयुर्विमा महामंडळाने विक्री साठी काढाव्यात व विमा प्रतिनिधींना एक आर्थिक स्थैर्य पुर्वीप्रमाणे प्राप्त होण्यासाठी कमिशन दरामध्ये बदल न करता, तसेच दिलेले कमिशन वसुलीबाबत असे कुठलेही विमा प्रतिनिधीसाठी घातक असलेले निर्णय घेण्यात येवू नये तसे स्पष्टपणे लेखी पत्रासह आश्वासन मिळावे. हि मागणी मी विमा प्रतिनिधींच्या वतीने आपणाकडे करत आहे. असे निवेदनात नमूद करुन पुणे विभाग १, नगर , सोलापुर मधील विमा प्रतिनिधी काही प्रतिनिधीक स्वरुपात आपल्या कार्यालयसमोर दिनांक १७/१२/२०२४ रोजी उपस्थित राहून सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत सविनय सत्याग्रह आंदोलन करणार आहेत. असा इशारा दिला.तरी कृपया याची नोंद घेवून आमच्या विमा प्रतिनिधींच्या भावना सन्माननीय चेअरमन वरिष्ठांना आपल्या मार्फत कळविण्यात याव्यात की जेणेकरुन सत्याग्रह करण्याची वेळ येणार नाही. आम्हाला न्याय मिळेल. अशी अपेक्षा प्रमोदकुमार छाजेड यांनी व्यक्त केली आहे.

# हरिभाऊ डोळसे यांचे सामाजिक कार्यात मोठे योगदान– महेश कुलकर्णी

## सिद्धीबाग जलतरण तलाव येथील सदस्यांनी केला हरिभाऊ डोळसे यांचा सत्कार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ डोळसे यांनी जलतरण तलाव येथे सातत्याने अनेक उपक्रम राबविले आहेत.स्विमिंग करणाऱ्या सर्व सदस्यांनी आनंदी राहावे व सामाजिक कार्य करावे यासाठी हरिभाऊ डोळसे हे नेहमीच पुढाकार घेत असतात. हरिभाऊ डोळसे यांचे सामाजिक कार्यात मोठे योगदान आहे.असे प्रतिपादन चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे अध्यक्ष महेश कुलकर्णी यांनी केले आहे.

सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ डोळसे यांचा वाढदिवसानिमित्त सिद्धीबाग येथील जलतरण तलाव येथील सर्व सदस्यांनी डोळसे यांचा फेटा बांधून, फुलांचा वर्षाव करून सत्कार केला.याप्रसंगी राजू मामा जाधव,राजेंद्र डांगे,अनिल गांधी,राजेंद्र गांधी,अशोक आहुजा,राजेंद्र जोग,चौपाटी कारंजा मित्र मंडळाचे अध्यक्ष महेश कुलकर्णी,अमोल भंडारे,सुचित भळगट,किरण येवलेकर, पै.सचिन बर्डे, अॅड सय्यद सादिक, ज्ञानदेव सुपेकर,शेख सलीम, प्रज्वल वैद्य, अभिजित पाडळकर, विजय पळशीकर,राम गायकवाड,मेजर विकास खंडागळे,डॉ.अनिरूध्द गिते,डॉ अरूण वैद्य,महेद्र दिवाणे,मनिष भंडारे,राजण सांळुके,अजय ढोणे,संजय लोंढे,कराळे मेजर, गवळी रावसाहेब, रमेश चिपाडे, नागेश कुलकर्णी, अभिजीत पुप्पाल,पंडितराव लोंमटे, एम.डी.कुलकर्णी, मेजर पाटिल, अँड.गिरिष कोळपकर आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधी सोहळ्यात अहिल्यानगरच्या अपुर्वा निषाद हीने गायले राम राम जय राजा राम हे गीत



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील पार्श्वगायिका अपुर्वा निषाद हीने मुंबईत आझाद मैदान येथे झालेल्या मुख्यमंत्री शपथविधी सोहळ्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लिहिलेले व अजय अतुल यांनी संगीतबद्ध केलेले राम राम जय राजा राम हे गीत शपथविधी सोहळ्यात सादर केले. व भक्ती मय वातावरणात सर्व मुग्ध झाले. हे गीत अमृता फडणवीस यांनी गायलेले आहे. ते गीत मा.अमित शहा, मा.राजनाथ सिंग, मा.योगीजी या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत सादर होत असताना मा.पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे आगमन झाले. सर्व बातम्यांच्या चॅनल वर हे लाईव्ह सर्वांनी पाहिले.अपुर्वा निषाद ही पार्श्वगायक पं सुरेश वाडकर यांच्या कडे शास्त्रीय गायन, संगीतकार अशोक पत्की यांच्या कडे सुगम संगीत शिकली आहे.या बद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.



**गुरुवारी झालेल्या शपथविधी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांनी उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार यांची मुंबई येथे भेट घेतली. आमदार जगताप हे सलग तिस–यांदा आमदार झाले असून, मंत्रिपदासाठी प्रबळ दावेदार आहेत. त्यामुळे त्यांना पक्ष मंत्रिपदाची संधी देईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.**

(पान १ वरून)

## डॉ. आंबेडकरांनी देशाला राज्य घटनेच्या माध्यमातून एकसंघ ठेवण्याची किमया केली - शेंडगे

समिती सभापती गणेश कवडे ,शाम नळकांडे ,सचिन शिंदे, दत्ता कावरे , संतोष गेनपा, सुरेश तिवारी , गौरव ढोणे, केलास शिंदे आदि उपस्थित होते. याप्रसंगी गणेश कवडे म्हणाले, डॉ.बाबासाहेबांच्या विचारातच देशाचे, अखिल मानवजातीचे कल्याण आहे. डॉ.बाबासाहेबांचे मानवकल्याणाचे विचार सर्वदूर पोहोचतील. त्यातून देशाची राज्यघटना, एकता, समता बंधूतेचा विचार अधिक मजबूत होईल, यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज आहे.

## आयुष्यात पुढे जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यास व क्रीडांगणांची सांगड घालावी – डॉ.मनीषा पुंडे

अनंत देसाई म्हणाले, जीवनात अभ्यास महत्वाचा आहेच पण शारीरिक संपदाही खूप महत्वाची असते. म्हणूनच दादा चौधरी विद्यालयातील विद्यार्थ्यांना विविध खेळांचे प्रशिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अनेक क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेत नैपुण्य मिळवले आहे. येथील विद्यार्थ्यांमधून चांगले खेळाडू निर्माण व्हावेत यासाठी शीवछत्रपती पुरस्कात प्राप्त खेळाडू डॉ.मनीषा पुंडे यांच्या सारख्या व्यक्तिमत्वाचा आदर्श व प्रेरणा विद्यार्थ्यांनी घ्यवी.अजित बोरा यांनीही मार्गदर्शन करून क्रीडा क्षेत्रातही चांगले करियर करण्याची संधी असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रस्तावप्रास्ताविक प्रा.शिंदे यांनी केले. जयसुधा ताटी यांनी आभार मानले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षणाचे पुरस्कर्ते होते – बाळासाहेब बोराटे

## श्री संत सावताश्रम शिक्षण संस्थेच्यावतीने अभिवादन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्त्रीमुक्तीचे समर्थक होते. त्यांच्यावर तथागत गौतम बुद्धांच्या शिकवणुकीचा आणि महात्मा जोतिबा फुलेंच्या कार्याचा प्रभाव होता. ते शिक्षणाचे पुरस्कर्ते होते. शिक्षणाशिवाय व्यक्ती, समाजाची प्रगती शक्य नाही, असे ते मानत. स्वतंत्र भारताचे पहिले कायदामंत्री असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा भारतीय संविधानात सिंहाचा वाटा होता. कोणावरही अन्याय न करता सर्वांना समान हक्क, अधिकार देणार्या डॉ.बाबासाहेबांच्या असामान्य बुद्धीची प्रचिती संविधानावरून येते. संविधानाच्या माध्यमातून देशाला एकसूत्रात बांधण्याचे काम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले, असे प्रतिपादन सावताश्रम शिक्षण संस्थेचे चेअरमन तथा माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे यांनी केले.

श्री संत सावताश्रम शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले विद्या मंदिर व सावित्री बाई फुले विद्यालयाच्यावतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामहापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, सचिव प्रा सुनील जाधव ,परेश लोखंडे , मुख्याध्यापक राजकुमार शिंदे,माध्यमिक मुख्याध्यापक राजीव घोलप व शिक्षक वृंद उपस्थित होते.

याप्रसंगी सचिव प्रा सुनिल जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त्त केले तर मुख्याध्यापक राजकुमार शिंदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनातील प्रसंगी सांगितले. माध्यमिक मुख्याध्यापक राजीव घोलप यांनी आभार मानले.